संक्षिप्त

देवरूख : लगोरी स्पर्धेचे उद्घाटन करताना डॉ. प्रज्ञा कदम.

नवनिर्माण महाविद्यालयात रंगला लगोरीचा खेळ

देवरूख : हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय क्रीडा दिनाचे औचित्य साधून लोवले येथील नवनिर्माण महाविद्यालयात लगोरी, व्हॉलीबॉल आणि बॅडमिंटन स्पर्धा उत्साहात पार पडल्या. यामध्ये पारंपरिक खेळ असलेल्या लगोरीला विशेष प्राधान्य देण्यात आले. विद्यार्थ्यांनी या स्पर्धांना उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. लगोरीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना पारंपरिक खेळाची ओळख करून देण्याबरोबरच त्याचे नियम आणि खेळण्याची पद्धत याबाबत माहिती देण्यात आली. विशेषतः नवयुवतींनी या खेळात मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. नवनिर्माण महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. संजना चव्हाण व नवनिर्माण नर्सिंग महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. प्रज्ञा कदम यांनी मैदानात उतरून खेळामध्ये सहभाग घेत विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले. लगोरी स्पर्धेचे उद्घाटन डॉ. प्रज्ञा कदम यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. संजना चव्हाण, डॉ. संतोष खरे, प्राध्यापक मितेश पवार, प्रा. प्रशांत जाधव, प्राध्यापक निकिता कदम, प्राध्यापक झिबा अलजी, प्राध्यापक राजवाडे, प्राध्यापक सिमरन वाडकर यांच्यासह शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. राष्ट्रीय क्रीडा दिनाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये शारीरिक तंदुरुस्ती, संघभावना, नेतृत्वगुण आणि पारंपरिक खेळांविषयी आवड निर्माण करण्याचा संदेश देण्यात आला. विविध स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत क्रीडा दिन उत्साहात साजरा केला. या स्पर्धा महाविद्यालयाच्या क्रीडा विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आल्या होत्या.

चिपळूण : बाल मेळाव्यात मुलांसह शिक्षकवर्ग.

दळवटणेत बाल मेळावा उत्साहात

चिपळूण : चिपळूण तालुक्यातील एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्प, चिपळूण नं. १ अंतर्गत बीट अडरे नं.२ मधील दळवटणे बागवाडी अंगणवाडी केंद्रात 'नवचेतना' व 'आधारशिला' उपक्रमांतर्गत बालक व पालकांचा वेलकम मेळावा उत्साहात आणि जल्लोषात संपन्न झाला. या कार्यक्रमाचे उद्घाटन पंचायत समिती सदस्या मेघा इंगवले यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आले. त्यानंतर अंगणवाडीतील बालक व पालकांचे स्वागत करण्यात आले. 'नवचेतना' व 'आधारशिला' या उपक्रमांची माहिती देताना अंगणवाडी सेविका ऋतुजा इंगवले यांनी पूर्व प्राथमिक शिक्षणाचे महत्त्व, आरोग्य व स्वच्छता तसेच बालकांचा सामाजिक, मानसिक, शारीरिक, बौद्धिक व भाषिक विकास याबाबत मार्गदर्शन केले. अंगणवाडी सेविकांच्या वतीने पंचायत समिती सदस्या मेघा इंगवले, तसेच उपस्थित पालकांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी अंगणवाडी केंद्रातील अंगणवाडी सेविका व मदतनीस, पालक तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंगणवाडी सेविका, तर रोशनी जाधव व अर्चना जाधव यांनी उपस्थितांचे आभार मानले.



दापोली : वराडकर-बेलोसे महाविद्यालयात जलसंधारण दिन कार्यक्रमात मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. भारत कन्हाड व उपस्थित विद्यार्थी.

वराडकर-बेलोसे महाविद्यालयात जलसंधारणदिनी जलसंवर्धनाची प्रतिज्ञा

दापोली : वराडकर-बेलोसे महाविद्यालयात जलसंधारण दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. भारत कन्हाड होते, तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून ग्रंथपाल तेजस रेवाळे उपस्थित होते. इको क्लबचे प्रमुख प्रा. मालदेव कांबळे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी पावसाचे पाणी अडवणे, ते जमिनीत मुरवणे, पाण्याचा काटकसरीने वापर करणे आणि जलस्रोतांचे संरक्षण करण्याचे महत्त्व स्पष्ट करण्यात आले. "पाणी अडवा, पाणी जिरवा" हा जलसंधारणाचा मूलमंत्र देत विद्यार्थ्यांनी घराघरात पाणी बचतीचा संदेश पोहोचवावा, असे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांना जलसंवर्धनाची प्रतिज्ञा देण्यात आली.

अखिल भारतीय विज्ञान मेळाव्यात तालुकास्तरावर रिया गिजे प्रथम

माखजन : संगमेश्वर तालुक्यात आयोजित अखिल भारतीय विज्ञान मेळाव्यात 'भारतीय ऊर्जा क्षेत्र २०४७ भवितव्य (संधी) आणि आव्हाने' या विषयात ताम्हाणे हायस्कूलच्या रिया रवींद्र गिजे हिने प्रथम, तर पैसाफंड संगमेश्वरच्या क्रिशा कपिल इंदानी हिने द्वितीय क्रमांक पटकावला. या दोन्ही विद्यार्थिनींची निवड जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी झाली आहे. स्पर्धेत अर्णव सागर सकपाळ (पाध्ये इंग्लिश स्कूल, देवरुख) व ध्रुव कौस्तुभ जोशी (न्यू इंग्लिश स्कूल, देवरुख) यांना तृतीय क्रमांक विभागून देण्यात आला. तसेच मीरा अनंत लिंगायत (दादासाहेब सरफरे विद्यालय), सृष्टी सोमनाथ सराटे (कसबा हायस्कूल) यांनी उत्तेजनार्थ क्रमांक पटकावले. यावेळी विस्तार अधिकारी शशिकांत त्रिभुवने यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. स्पर्धेचे परीक्षण प्रा. गौरव पोंक्षे, प्रा. प्रशांत जाधव, प्रा. पृथ्वीराज वाडकर यांनी केले. यावेळी संगमेश्वर तालुका विज्ञान मंडळाचे अध्यक्ष संदीप जाधव, उपाध्यक्ष अमृत मेंगाल, कोषाध्यक्ष सुरज कदम, सचिव विनोद सरदेसाई, अर्चिता कोकाटे आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन विद्या खाडे तर आभार प्रदर्शन अमृत मेंगाल यांनी केले.

मठधामापूरच्या यश गुरवने राष्ट्रीयस्तरावर घेतली झेप

साडवली : पुढारी वृत्तसेवा

संगमेश्वर तालुक्यातील मठधामापूर गावचा सुपुत्र व माध्यमिक विद्यामंदिर ताम्हानेचा विद्यार्थी यश महेंद्र गुरव याची मथुरा (उत्तर प्रदेश) येथे १ ते ७ ऑक्टोबर या कालावधीत होणाऱ्या U-१७ राष्ट्रीय (नॅशनल) टेनिस क्रिकेट चॅम्पियनशिप २०२६ या स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

यश याला लहानपणापासूनच क्रिकेटची आवड होती. आपल्या मुलाची आवड लक्षात घेऊन वडील महेंद्र गुरव यांनी त्याला पाठबळ दिले. क्रिकेटच्या सरावासाठी आपल्या जागेत मैदान उपलब्ध करून देत त्यांनी यशच्या खेळाला प्रोत्साहन दिले. इलेव्हन फायटर धामापूर या स्थानिक संघातून यशने आपल्या क्रिकेट खेळाला सुरुवात केली.

आई-वडिलांनी दिलेले प्रोत्साहन व त्यांनी आपल्यासाठी घेतलेली मेहनत याची जाणीव ठेवत त्यांच्या मार्गदर्शनाखाली तालुका, जिल्हा, राज्य व आता राष्ट्रीयस्तरावर यशने घेतलेली झेप ही कौतुकास्पद आहे. यशने मिळविलेल्या या संधीमुळे जिल्ह्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

रत्नागिरी जिल्ह्यात नळजोडणीचे ८६ टक्के काम पूर्ण

३ लाख ८८ हजार ५२८ घरांमध्ये नळजोडणी पूर्ण; ५९ हजार ६२३ नळजोडणीची कामे प्रलंबित

रत्नागिरी : पुढारी वृत्तसेवा

सरकारच्या महत्त्वकांक्षी जलजीवन मिशन अंतर्गत ग्रामीण भागातील प्रत्येक घरापर्यंत चांगले, शुध्द पाणी पोहोचवण्यासाठी राबवण्यात आलेल्या मोहिमेला चांगले यश आले आहे. ४ लाख ४८ हजार १६१ नळजोडण्यांचे जिल्ह्याला उद्दिष्ट देण्यात आले होते. त्यापैकी ३ लाख ८८ हजार ५२८ घरांमध्ये नळजोडणीचे काम पूर्ण झाले आहे. आतापर्यंत ८६ टक्के काम पूर्ण झाल आहे. जलजीवनच्या झालेल्या कामांमुळे हजारो कुटुंबांचा पाण्याचा प्रश्न मिटला आहे. नळजोडणीत गुहागर तालुक्याने बाजी मारली असून तब्बल ४० हजार ३०६ घरांमध्ये नळजोडणी पूर्ण झाली आहे. तर सर्वात कमी नळजोडणी लांजा तालुक्यात झाली आहे.

राज्य, केंद्र शासनाची महत्वाकांक्षी योजना म्हणून जलजीवन मिशनकडे पाहिले जाते. पहिल्या टप्प्यात सुरूवात झाल्यानंतर मोठ्या प्रमाणात कामे झाली आणि

तालुकानिहाय नळजोडणी

तालुका	टक्केवारी	नळजोडणी संख्या
गुहागर	१४.७०	४०,३०६
चिपळूण	१३.१५	६४, ६४४
दापोली	१२.४८	४५,४२१
मंडणगड	१०.७४	१८,२६५
लांजा	८८.६७	२३,२७१
रत्नागिरी	८५.८६	५१,६०७
संगमेश्वर	८१.७७	५१,४४१
राजापूर	८१.१७	४०,९६०
खेड	७७.४	४४,५७३
एकूण	८६.७०	३ लाख ८८ हजार ५२८

कित्येकांच्या घरी पाणी आले. त्यानंतर मागील वर्षभरापासून निधीअभावी कामे रखडत गेली. त्यामुळे कामांना ब्रेकच लागला होता.

अखेर जिल्ह्यात पावणे चार लाखांहून अधिक नळजोडणी पूर्ण झाली आहे. उर्वरित ५९ हजार ६२३ नळजोडण्याचे काम सध्या सुरू आहे. लवकरच जिल्हा १०० टक्के नळजोडणीचा टप्पा गाठण्याच्या मार्गावर आहे. नळजोडणीचे काम पूर्ण झाल्यास खऱ्या अर्थाने पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मिटणार आहे.

निधी मिळाल्यास आणखीन कामांना वेग

जलजीवन मिशनच्या कामांसाठी जिल्ह्याला ११ कोटी आले आहेत. प्रशासनाच्या वतीने लवकरात लवकर ठेकेदारांच्या खात्यात वर्ग केल्यास काम सुरू करण्यास वेग येईल. पुढील काही महिन्यात नळजोडणीचे काम पूर्ण होण्यास मदत होणार आहे.

माजी नौसैनिक, ज्येष्ठ पत्रकार अरुण आठल्ये यांचे निधन

रत्नागिरी : खानू येथील ज्येष्ठ पत्रकार आणि माजी नौसैनिक अरुण कृष्णानाथ आठल्ये यांचे शनिवारी २९ ऑगस्ट रोजी सायंकाळी अल्पशा आजाराने निधन झाले. ते ७८ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात दोन भाऊ, दोन बहिणी, पुतणे असा परिवार आहे.

१९७१ च्या भारत-पाकिस्तान युद्धात त्यांचा सहभाग होता. नौदलातून निवृत्त झाल्यानंतर अरुण आठल्ये यांनी मर्चंट नेव्हीमध्ये काही काळ सेवा बजावली. त्यानंतर त्यांनी खानूचे सरपंच पदही भूषवले. त्याच बरोबर विविध वृत्तपत्रांत त्यांनी मुक्त पत्रकार म्हणून काम केले. यादरम्यान त्यांनी अनेक समस्यांना वाचा फोडली होती.

त्यांच्यावर खानूमध्ये ३० ऑगस्ट रोजी सकाळी ८ वाजता अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

गणेशोत्सवात चाकरमान्यांची 'लालपरीला'च पसंती

रत्नागिरी : पुढारी वृत्तसेवा

गणेशोत्सवासाठी आपल्या मूळ गावी चाकरमानी रत्नागिरी जिल्ह्यात मोठ्या संख्येने येत असतात. त्यामुळे चाकरमान्यांचा प्रवास सुखकर होण्यासाठी परतीच्या प्रवासासाठी २,५०० एसटी बसेसचे नियोजन केले आहे. आतापर्यंत ९ आगारातून तब्बल ७५० एसटी बसेसचे बुकींग झाले आहे. चाकरमान्यांनी लालपरीलाच पसंती दिली आहे.

गणेशोत्सवात प्रत्येक कोकणकर आपल्या गावी हमखास येतोच. यंदाचा गणेशोत्सव १२ दिवसांचा असणार आहे. त्यामुळे आतापासूनच गणपती आगमनाची तयारी सुरू झाली आहे. लाखोंच्या संख्येने चाकरमानी कोकणात येणार आहेत. चाकरमान्यांसाठी यंदाही महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या जादा बसेसचे नियोजन केले आहे.

मुंबईतून सुमारे ५ हजार बसेस सोडण्यात येणार आहे. तर परतीसाठी रत्नागिरी विभागाच्या वतीने २ हजार ५०० बसेसचे नियोजन केले असून त्यासाठी ऑनलाईन आरक्षण सुरू केले होते. आतापर्यंत ७५० एसटी बसेसचे बुकींग झाले आहे. प्रवाशांनी ऑनलाईनसह ऑफलाईन ग्रुप बुकींग करावे, असे आवाहन करण्यात आले. महिला, ज्येष्ठ नागरिकांसाठी यंदाही सवलत ठेवण्यात आली आहे.

गुहागर : पत्रकार परिषदेत बोलताना उपसभापती नीलेश सुर्वे.

गुहागरमध्ये असलेले अवैध धंदे कोणाचे?

गुहागर शहर : पुढारी वृत्तसेवा

शृंगारतळी येथे आमदार भास्कर जाधव यांनी केलेल्या जुगारसंदर्भातील विधानावरून गुहागर भाजप आक्रमक झाले आहे. शृंगारतळी किंवा गुहागरमध्ये असलेले सर्व अवैध धंदे हे फक्त भाजपचेच आहेत का? गुहागरमध्ये असलेले अवैद्य धंदे कोणाचे आहेत? असा थेट सवाल भाजप जिल्हा सरचिटणीस व उपसभापती नीलेश सुर्वे यांनी केला आहे.

शृंगारतळी येथील निळकंठेश्वर मंदिरात रामरक्षा आंदोलनादरम्यान भास्कर जाधव यांनी भाजपमध्ये मटकाकिंग जास्त आहेत आणि तशी रतनखत्री नावाची व्यक्ती शृंगारतळीत आहे, असे वक्तव्य केले होते. या वक्तव्याचा समाचार नीलेश सुर्वे यांनी शृंगारतळीतील पत्रकार परिषदेत घेतला.

याबाबत बोलताना ते म्हणाले, आम्ही पोलिस निरीक्षक व उपविभागीय पोलिस अधिकारी यांना निवेदन दिले आहे की, गुहागरमध्ये असलेल्या सर्व अवैध धंद्यांवरती कारवाई करून त्या सर्वांची नावं प्रसारित करावी, जेणेकरून ते धंदे भास्कर जाधव यांच्या कार्यकर्त्यांचे आहेत की भाजपचे आहेत, हे सर्वांना कळेल.

यावेळी नीलेश सुर्वे यांनी आबलोलीत रामरक्षा आंदोलनादरम्यान भास्कर जाधव यांनी नरेंद्र मोदी यांच्या जनधन योजनेवर केलेल्या टीकेलाही प्रत्युत्तर दिले. तसेच पंचायत समितीच्या निधी वाटपाबाबत भास्कर जाधव यांनी केलेल्या वक्तव्यावरून सुर्वे आक्रमक झाले. भाजपवर बोललो नाही तर आपले राजकीय अस्तित्व संपून जाईल, याच भीतीने जाधवांची भाजपवर आगपाखड असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

या पत्रकार परिषदेला तालुका सरचिटणीस संतोष सांगळे, सचिन ओक, विश्वास बेलवलकर, उपाध्यक्ष विनायक सुर्वे, आशिष विचारे, महेश तोडणकर, साईनाथ काळझुणकर, प्रमोद जाधव, मंगेश रांगले, दीपक मोरे आदी भाजप पदाधिकारी उपस्थित होते.

ज्ञानदीप महाविद्यालयात राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात

'विकसित भारत युवा कनेक्ट' उपक्रमांतर्गत राष्ट्रीय कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण

खेड : पुढारी वृत्तसेवा

मोरवंडे-बोरज येथील ज्ञानदीप महाविद्यालयात 'विकसित भारत युवा कनेक्ट' कार्यक्रमांतर्गत राष्ट्रीय क्रीडा दिन २०२६ निमित्त राष्ट्रीय स्तरावरील कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण उत्साहात करण्यात आले.

भारत सरकारच्या युवा कार्य व क्रीडा मंत्रालयांतर्गत 'मेरा युवा भारत'च्या माध्यमातून आयोजित या कार्यक्रमाचा उद्देश युवकांना क्रीडा, तंदुरुस्ती, नेतृत्व, स्वयंसेवा आणि राष्ट्रनिर्मितीशी जोडणे हा आहे. यावेळी विद्यार्थ्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा युवकांशी संवाद असलेला 'खेल की बात, प्रधानमंत्री के साथ' हा विशेष कार्यक्रम पाहिला. यामध्ये क्रीडा क्षेत्रातील संधी, भारताची क्रीडा संस्कृती, प्रतिभाविकास, नशामुक्ती अभियान आणि भविष्यातील क्रीडा क्षेत्रावर संवाद साधण्यात आला. कार्यक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये क्रीडा सहभाग, शारीरिक तंदुरुस्ती, शिस्त, नेतृत्वगुण व सामाजिक जबाबदारी याबाबत जागृती करण्यात आली. "फिट युवा, सक्षम युवा, विकसित भारत" या भावनेतून विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. परेश रानिम व स्वरा कदम यांनी कार्यक्रमाबाबत प्रतिक्रिया व्यक्त केली. यावेळी प्रा. डॉ. उमेशकुमार बागल, प्राचार्य डॉ. विजय अनंत कुलकर्णी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

खेड : ज्ञानदीप महाविद्यालयात विकसित भारत युवा कनेक्ट प्रोग्रॅम अंतर्गत राष्ट्रीय क्रीडा दिन कार्यक्रम उपस्थित मान्यवर.

राष्ट्रीय भ्रष्ट्राचार नियंत्रण, मानवी कल्याण संघटना तालुकाध्यक्षपदी नांदिवडेकर

माखजन : पुढारी वृत्तसेवा

चिपळूण तालुक्यातील प्राथमिक शाळा आगवे येथे शिक्षक म्हणून कार्यरत असलेले रामचंद्र गंगाराम नांदिवडेकर यांची महाराष्ट्र राज्य महासचिव व्यंकटेश महादेव अटक यांच्या शिफारशीनुसार राष्ट्रीय भ्रष्ट्राचार नियंत्रण आणि मानवी कल्याण संघटना चिपळूण तालुका अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

ही नियुक्ती पुढील २ वर्षे म्हणजे २८ ऑगस्ट ते ३१ जुलै २०२६ या कालावधीसाठी करण्यात आली आहे. लवकरच नांदिवडेकर यांना नियुक्तीपत्र व ओळखपत्र दिले जाईल, असे आदेशाचे पत्र नुकतेच प्राप्त झाले आहे. नांदिवडेकर यांच्या नियुक्तीमुळे चिपळूण तालुक्यातील शिक्षक मित्र, हितचिंतक आदींकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

मंडणगड : वर्षा सहलीमध्ये सहभागी विद्यार्थी-विद्यार्थिनी व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी.

मंडणगड किल्ल्यावर विद्यार्थ्यांनी घेतला वर्षा सहलीचा आनंद

मंडणगड : पुढारी वृत्तसेवा

येथील सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळाच्या लोकनेते गोपीनाथजी मुंडे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय व कर्मवीर भि. रा. तथा दादा इदाते कनिष्ठ महाविद्यालयाच्या वतीने नुकतेच किल्ले मंडणगड येथे वर्षा सहल काढण्यात आली.

यावेळी प्राचार्य डॉ. वाल्मीक परहर व उपप्राचार्य डॉ.विष्णू जायभाये यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा.संदीप निर्वाण, डॉ. महेश कुलकर्णी, डॉ. संगीता घाडगे, प्रा. संजयकुमार इंगोले, डॉ. मुकेश कदम, प्रा. प्रितेश जोशी, प्रा. अशोक कंठाळे, प्रा. महादेव वाघ, प्रा. साई पवार, प्रा.प्राची कदम उपस्थित होत्या.

यानिमित्त किल्ल्यावर जाणा-या रस्त्याच्या कडेने एन.एस.एस. व वनस्पती शास्त्र विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांमार्फत संकलन केलेल्या विविध बियांचे चिखलाचे गोळे तयार करुन ते किल्ला परिसरात फेकण्यात आले. तसेच धनगरवाडी परिसरातील रस्त्याच्या दोन्ही बाजूला वृक्षारोपण करण्यात आले. 'झाडे लावा, झाडे जगवा' या उक्तीप्रमाणे संस्थेचे संचालक आदेश मर्चडे, उपप्राचार्य डॉ. विष्णू जायभाये यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

'उमा बेडेकर लायन्स ब्लड स्टोरेज सेंटर'चा ६ सप्टेंबरला शुभारंभ

रत्नागिरी : पुढारी वृत्तसेवा

लायन्स क्लब ऑफ रत्नागिरी चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून लायन्स नेत्र रुग्णालय रत्नागिरी येथे 'सौ. उमा वामन बेडेकर लायन्स ब्लड स्टोरेज सेंटर' सुरू करण्यात येत असून या केंद्राचा शुभारंभ रविवार, ६ सप्टेंबर रोजी होणार आहे.

गरजू रुग्णांना आवश्यकतेच्या वेळी सुरक्षित रक्त उपलब्ध व्हावे, या उद्देशाने सुरू करण्यात येणारे हे केंद्र रत्नागिरीच्या आरोग्य सेवेसाठी एक महत्त्वाचे पाऊल ठरणार आहे. अपघातग्रस्त रुग्ण, शस्त्रक्रिया, प्रसुती तसेच विविध वैद्यकीय परिस्थितींमध्ये रक्ताची आवश्यकता भासते. अशावेळी वेळेवर रक्त उपलब्ध होणे अत्यंत महत्त्वाचे असते. या पार्श्वभूमीवर कोल्हापूर येथील वैभवलक्ष्मी रक्तपेढीच्या सहकार्याने ब्लड स्टोरेज सेंटरची स्थापना करण्यात येत आहे. या केंद्राला सौ. उमा वामन बेडेकर यांचे नाव देण्यात येत आहे. डॉ. संतोष बेडेकर यांच्या आईच्या स्मृतितून सुरू होणारे हे केंद्र रत्नागिरीच्या माणुसकीच्या सेवेला नवी दिशा देईल आणि भविष्यात अनेक गरजू रुग्णांसाठी 'आशेचा आधार' ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

रिगल कॉलेजच्या बी.सी.ए. विद्यार्थिनींचे युवा महोत्सवात यश

दमदार सादरीकरण करत विद्यार्थिनींनी मिळवली ४ पदके; अंतिम फेरीसाठी निवड

चिपळूण : पुढारी वृत्तसेवा

रिगल कॉलेज ऑफ टेक्नॉलॉजीच्या बी.सी.ए. विभागातील विद्यार्थिनींनी एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठाच्या युवा महोत्सवात विविध स्पर्धा प्रकारांत दमदार सादरीकरण करीत विद्यार्थिनींनी चार पदके मिळवली असून या सर्वांची मुंबई येथे होणाऱ्या अंतिम फेरीसाठी निवड झाली आहे.

एसएनडीटी महिला विद्यापीठांतर्गत पुणे येथील के. बी. जोशी महाविद्यालयात युवा महोत्सवाच्या वेस्ट झोनची प्राथमिक फेरी पार पडली. या फेरीत सातारा, पुणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, कोल्हापूर जिल्ह्यांतील अनेक महाविद्यालयांनी सहभाग घेतला. रिगल कॉलेजच्या विद्यार्थिनींनी मराठी नाटुकली, पथनाट्य, मिमिक्री, भारतीय शास्त्रीय नृत्य, कोलाज, निबंध लेखन आदी स्पर्धा प्रकारांत सहभाग नोंदविला.

मराठी नाटुकली स्पर्धेत रिगल कॉलेजच्या विद्यार्थिनींनी 'मराठी इज नॉट अ जस्ट अनदर लँग्वेज' ही नाटुकली सादर केली. या प्रभावी सादरीकरणाला परीक्षकांची दाद मिळवत प्रथम क्रमांक व सुवर्णपदक मिळाले. या नाटुकलीत शांभवी पोंक्षे, गौरी डेरवणकर, आकांक्षा नरळकर, मैथिली रेपाल, दीक्षा पवार व प्रार्थना पटेल यांनी सहभाग घेतला. पथनाट्य स्पर्धेत विद्यार्थिनींनी सादर केलेल्या 'भ्रष्टाचाराला नाही म्हणा' या पथनाट्याला प्रथम क्रमांक व सुवर्णपदक मिळाले. या पथनाट्यात गौरी डेरवणकर, प्रार्थना पटेल, दिक्षा पवार, सिद्धी मोरे, वैदेही मालकर, मैथिली रेपाल, श्रेया काष्टये, अनुष्का देवळेकर, चिन्मयी भुवड व वेदिका गुरव यांनी सहभाग घेतला. मिमिक्री स्पर्धेत मृणाल धामणस्कर हिने रौप्यपदक तर भारतीय शास्त्रीय नृत्य स्पर्धेत शांभवी पोंक्षेने कांस्यपदक मिळवले. या यशामुळे संबंधित सर्व विद्यार्थिनींची मुंबई येथे होणाऱ्या युवा महोत्सवाच्या अंतिम फेरीसाठी निवड झाली. या विविध स्पर्धा प्रकारांसाठी साहिल चरकरी, दीपेश घाणेकर, संस्कार लोहार व जुईली पडवळ यांनी मार्गदर्शन व दिग्दर्शन केले.

चिपळूण : युवा महोत्सवात यश मिळवलेल्या रिगल कॉलेजच्या विद्यार्थिनी.

बँक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
A GOVT. OF INDIA UNDERTAKING
एक परिवार एक बैंक

नवी मुंबई क्षेत्रीय कार्यालय :– सिडको जुनी प्रशासकीय इमारत, पी-17 सेक्टर-1 वाशी, नवी मुंबई.
ई-मेल : bom2259@mahabank.co.in, legal_nvm@mahabank.co.in, दूरध्वनी -022-20878751/52

स्थावर मालमत्तांच्या विक्रीसाठी विक्री सूचना (परिशिष्ट ४–ए)

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, 2002 च्या नियम 8(6) आणि नियम 9(1)च्या तरतुदींसह सिक्युरीटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट कायदा 2002 अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव सूचना
सर्वसामान्यपणे लोकांना आणि विशेषत: कर्जदार आणि जामीनदार यांना सूचना देण्यात येत आहे की खाली वर्णन केलेल्या स्थावर मालमत्ता जी बँक ऑफ महाराष्ट्र यांच्याकडे गहाण/चार्ज्ड करण्यात आली आहे, बँक ऑफ महाराष्ट्रचे अधिकृत अधिकारी यांनी ताब्यात घेतली असून तिची विक्री 'जसे आहे जिथे आहे', 'जे आहे ते आहे' आणि 'तेथे जे असेल ते' या आधारे **15.09.2026** रोजी सकाळी **11.00** ते दुपारी **3.00** दरम्यान कर्जदार आणि जामीनदार यांच्याकडून तक्त्यात नमूद केलेली बँक ऑफ महाराष्ट्रला देणे असलेली रक्कम वसूल करण्यासाठी होणार आहे. कर्जदार आणि जामीनदार, थकबाकीचे तपशील आणि स्थावर मालमत्तेचे थोडक्यात वर्णन आणि त्यावरील माहित असलेल्या भाराचे, ताबा प्रकार, राखीव किंमत आणि बयाणा रक्कम यांचे तपशील खालीलप्रमाणे

शाखा	कर्जदार	जामीनदार	माहीत असलेल्या भारासहीत स्थावर मालमत्तेचे थोडक्यात वर्णन	ताबा प्रकार	मागणी सूचनेनुसार थकबाकीची रक्कम	राखीव मूल्य (रू.त)
एआरबी नवी मुंबई	**मे. दीपक ॲग्रीफ्रेश प्रायव्हेट लिमिटेड संचालक - 1. श्री. दीपक एकनाथ मोळे, 2. श्री. गणेश विष्णू साळवी** पत्ता- ऑफीस क्र. 414, 415, प्लॉट क्र. 2/3/4, कमोडिटी एक्स्चेंज इमारत, युनियन बँकेशेजारी, सेक्टर 19, वाशी, नवी मुंबई-400703	**श्री. दीपक एकनाथ मोळे,** पत्ता- फ्लॅट क्र. 1702, सनशाईन गाव, डी मार्ट जवळ, सेक्टर 8, घनसोळी, नवी मुंबई महाराष्ट्र-400701 **श्री. गणेश विष्णू साळवी,** पत्ता- फ्लॅट क्र. 801, सेलिब्रेशन सीएचएस लि., प्लॉट क्र. 23, सेक्टर क्र. 6 आणि सेक्टर 8, ऐरोली, नवी मुंबई महाराष्ट्र-400701 **श्रीमती सिद्धी गणेश साळवी,** पत्ता- फ्लॅट क्र. 801, सेलिब्रेशन सीएचएस लि., प्लॉट क्र. 23, सेक्टर क्र. 6 आणि सेक्टर 8, ऐरोली, नवी मुंबई महाराष्ट्र-400701	घर क्र. 229, जी. क्र. 86, एच. क्र. 4/1, श्री राम कृपा बंगल्यासमोर, दुर्गादेवी मंदिराजवळ, दुर्गा देवी रोड, गाव मौजे वरचा पाट, मु. पो. आणि तालुका- गुहागर, जि- रत्नागिरी, महाराष्ट्र पिन-415703	प्रतिकात्मक	रू. 3,83,95,478.6 (रूपये तीन कोटी त्र्याऐंशी लाख पंच्याण्णव हजार चारशे अठ्ठ्याहत्तर आणि साठ पैसे फक्त) अधिक एनपीए दिनांक 29/10/2023 पासूनचे लागू न झालेले व्याज 12.20% दराने आणि 2% दराने दंडात्मक व्याज अधिक मुदत संपेपर्यंतचे चार्जेस, मूल्य आणि इतर खर्च	16694000

इएमडी राखीव मूल्याच्या 10%
पाहणीचा दिनांक : 07.09.2026,
संपर्क तपशील - श्री. मनमोहन मुर्मू, शाखा व्यवस्थापक, एआरबी शाखा-9552808185 श्रीमती सानिया खोब्रागडे, व्यवस्थापक एआरबी 9049376443
विक्रीच्या तपशीलवार शर्ती आणि अटींसाठी बँकेच्या वेबसाईटमध्ये देण्यात आलेली https://www.bankofmaharashtra.in/propsale.asp ही लिंक पहा आणि इ-बिक्रे पोर्टलवरही (www.baanknet.com)पहा.

दिनांक : 29.08.2026
ठिकाण : नवी मुंबई

अधिकृत अधिकारी आणि
बँक ऑफ महाराष्ट्र, नवी मुंबई क्षेत्र